जिल्हा परिषद, रायगड

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
## (निविदा सुचना नं. २६ सन २०२६-२७)

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडील खालील कामांची निविदा योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यांत येत आहेत. तरी खालील निविदाबाबतची सर्व माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी (जीएसटी सह) | वर्गवारी | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|
| **पहिले बोलावणे** | | | | | | |
| १ | छत्रपती शिवाजी महाराज यांचे ३५३ वा राज्यभिषेक सोहळ्याकरीता दि.०६/०६/२०२६ व दि. २६/०६/२०२६ दरम्यान रायगड किल्यावर व गडाखाली शौचालय पुरविणे ता.महाड जि.रायगड | ५३६०९१७/- | ५३६०९/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार खुला |

- **वरील कामाची संपुर्ण माहिती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १८/०५/२०२६ रोजी १०.०० वाजलेपासून ते दि.२२/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत उपलब्ध आहे, यादरम्यान निविदा भरता व डाऊनलोड करता येतील.**

- **निविदेचे वेळापत्रक -**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई- निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. १८/०५/२०२६ पासून | १०.०० |
| | दि. २२/०५/२०२६ पर्यत | १७.०० |
| ई- निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. २२/०५/२०२६ पर्यत | १७.०० |
| ई- निविदा उघडणेची वेळ व तारिख | दि. २५/०५/२०२६ नंतर (कार्यालयीन सोयीनुसार) | १७.०० |
| ई- निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप- अलिबाग | |
| | मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग राजिप | |
| | मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, राजिप,अलिबाग | |

- गडावरील, गडाखालील शौचालय व्यवस्थापन करिता इतर अटी व शर्ती

| अ.क्र | शौचालय व्यवस्थापन (गडावर) | शौचालय व्यवस्थापन (गडाखाली) |
|---|---|---|
| 1 | 1. गडावर प्राधिकरणाद्वारे निश्चित करून दिलेल्या ठिकाणी पक्के व फिरते शौचालयाची दैनंदिन सफाई करणे.<br>2. शौचालय व्यवस्थापन करिता गडावरील शौचालयाची जागा निश्चित करणे व आवश्यक मनुष्यबळ पुरविणे याबाबत ई निविदा प्रसिद्ध झालेनंतर संबधित इच्छुक एजन्सीने ज्या ठिकाणी शौचालय बसविण्याचे आहे. त्याठिकाणची स्थळ पाहणी रायगड प्राधिकरण समिती सदस्य, एजन्सी प्रमुख यांनी स्वतः उपस्थित राहून पं.स.व जि.पं.चे शासकीय अधिकारी यांचे समवेत करावी. व स्थळ पाहणी अहवाल टेंडरला जोडणे, स्थळ पाहणीचा अहवाल बंधनकारक राहील<br>3. सदर कामामध्ये गडावर तात्पुरते शौचालय | 1. शौचालय व्यवस्थापन हे गडाखाली निच्छित केलेल्या ठिकाणी फिरते (Mobile) शौचालय व त्याकरिता पाणी पुरविणे.<br>2. शौचालय व्यवस्थापन करिता गडाखालील शौचालयाची जागा निश्चित करणे व आवश्यक मनुष्यबळ पुरविणे याबाबत ई निविदा प्रसिद्ध झालेनंतर संबधित एजन्सीने ज्या ठिकाणी शौचालय बसविण्याचे आहे त्याठिकाणची स्थळ पाहणी रायगड प्राधिकरण समिती सदस्य, एजन्सी प्रमुख, समिती प्रमुख यांनी स्वतः उपस्थित राहून पं.स.व जि.पं.चे शासकीय अधिकारी यांचे समवेत करावी.<br>3. सदर कामामध्ये गडाखाली तात्पुरते शौचालय पुरविलेनंतर त्यातील मैला जमा झालेनंतर त्यावर पर्यावरण पूरक कल्चर टाकणे, दुर्गंधी नाशक वापरासह त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट |

| | | |
|---|---|---|
| | पुरविलेनंतर त्यातील मेला जमा झालेनंतर त्यावर पर्यावरण पूरक कल्चर टाकणे, दुर्गंधी नाशक वापरासह त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणेची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची असेल व सदर मैला हा नागरीकांना त्रास व रोगराई पसरेल असे इतरत्र कोठेही टाकता येणार नाही.<br>4. कार्यक्रमापूर्वी गडावर मोबाईल शौचालयांचे इनस्टॉलेशन करून घेणे, पाण्याची व्यवस्था, तसेच शौचालयांवर नंबर टाकणे, पुरुष व स्त्रिया करिता स्वतंत्र शौचालय व्यवस्था करणे तसेच दि. 4 ते 6 जून तसेच 25 ते 26 जून 2026 रोजी मोबाईल शौचालय पूर्ण क्षमतेने वापराकरिता उपलब्ध करणे.<br>5. कार्यक्रमापूर्वी गडावर लोअर स्टेशन ते अप्पर स्टेशन रोपवेने आवश्यक साहित्य पोहचविणे, निश्चित केलेल्या ठिकाणी बसविणे यासाठी यासाठी लागणारा वेळ विचारात घेवून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे.<br>6. शौचालय स्वच्छता साफ सफाई साठी एजन्सीने पुरेसे सफाई कर्मचारी, हॅड ग्लोज, मास्क, सफाई साहित्य दुर्गंधी नाशक कल्चर, ड्रेसकोड सह नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित ठेवणे.<br>7. केलेल्या कामांचे फोटो अक्षांश व रेखांश सहीत काढून ठेवणे.<br>8. अंतिम देयक अदा करताना गटविकास अधिकारी, पंचायत समिती महाड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व), कार्यकारी अभियंता (ग्रापापू) यांचे प्रमाणपत्र (certificate) असल्याशिवाय अंतिम देयक अदा करणेत येणार नाही. तसेच Mobile तक्रार निवारण कक्षामध्ये संबधित निविदा धारकाने जबाबदार कर्मचारी यांची नेमणूक करणे.<br>9. गडावर स्वच्छता संबधित साहित्य कार्यक्रमापूर्वी वेळेत पोहचविणे व कार्यक्रम झाल्यावर त्वरित शौचालय गडाखाली आणणे. | लावणेची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची असेल व सदर मेला हा नागरीकांना त्रास व रोगराई पसरेल असे इतरत्र कोठेही टाकता येणार नाही.<br>4. गडाखाली मोबाईल शौचालयांचे इनस्टॉलेशन करून घेणे, पाण्याची व्यवस्था, तसेच शौचालयांवर नंबर टाकणे, पुरुष व स्त्रिया करिता स्वतंत्र शौचालय व्यवस्था करणे. दि. 4 ते 6 जून तसेच 25 ते 26 जून 2026 रोजी मोबाईल शौचालय पूर्ण क्षमतेने वापराकरिता उपलब्ध करणे.<br>5. गडाखालील मोबाईल शौचालय भरल्यानंतर सक्शन पंपाव्दारे टाक्या रिकाम्या करून त्या मैलांचे योग्य व्यवस्थापनांकरिता मैला व्यवस्थापनाला देणे.<br>6. गडाखालील निश्चित केलेल्या ठिकाणी मोबाईल शौचालयाकरिता पुरेसे पाणी व्यवस्था, बादली, मग, व पाणी साठविण्यासाठी टाक्या उपलब्ध करून देणे, फिरते शौचालये स्वच्छ राहतील याची जबाबदारी एजन्सीची राहील. तसेच याठिकाणी विजेची व्यवस्था करावी.<br>7. कार्यक्रमापूर्वी गडाखालील ठिकाणांवर शौचालय साहित्य पोहचविणे व निश्चित केलेल्या ठिकाणी बसविणे यासाठी यासाठी लागणारा वेळ विचारात घेवून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे.<br>8. शौचालय स्वच्छता साफ सफाई साठी एजन्सीने पुरेसे सफाई कर्मचारी, हॅड ग्लोज, मास्क, सफाई साहित्य दुर्गंधी नाशक कल्चर, ड्रेसकोड सह नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित ठेवणे.<br>9. गडाखालील ठिकाणी तात्पुरते शौचालय बसविणेसाठी आवश्यक त्या परवानग्या संबधित विभागाकडून प्राप्त करून घेणे.<br>10. केलेल्या कामांचे फोटो अक्षांश व रेखांश सहीत काढून ठेवणे.<br>11. अंतिम देयक अदा करताना गटविकास अधिकारी, पंचायत समिती महाड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व), कार्यकारी अभियंता (ग्रापापू) यांचे प्रमाणपत्र (certificate) असल्याशिवाय अंतिम देयक अदा करणेत येणार नाही. तसेच Mobile तक्रार निवारण कक्षामध्ये संबधित निविदा धारकाने जबाबदार कर्मचारी यांची नेमणूक करणे. |

**निविदेच्या अटी व शती खालीलप्रमाणे-**

1) वरील कामाची निविदा पी (Tender Fee) इसारा रक्कम ही शासनाचे वरील www. Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आपले लॉगीन दवारे भरणेची सुविधेनुसार भरणा करावी व त्याची PDF प्रत तांत्रिक लिफाफ्यात अपलोड करावी.
2) निविदा भरणेपूर्वी संबधित ठेकेदाराने निवीदेत जाहीर केलेल्या वेळेनुसार गडाखालील व गडावरील स्थळ पाहणी केलेचा अहवाल / प्रमाणपत्र संबधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे जोडणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र नसल्यास संबधित ठेकेदारास अपात्र करणेत येईल.
3) गडावर व गडाखाली आपले मार्फत काम करणा-या मजुरांचा विमा उतविणे बंधनकारक राहील व सदर विम्याची प्रत विभागीय कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल
4) जि. प. रायगड यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार खुला नोदणी प्रमाणपत्राची मूळप्रत (Registration Copy) निविदेसोबत अपलोड करावी लागेल
5) खुल्या वर्गातील कंत्राटदारांकडे जिल्हा परिषद रायगड कडील नोंदणी प्रमाणपत्र नाही अशा कंत्राटदारांनीकंत्राटदार नोदणी प्रमाणपत्र प्राप्त करावे व निविदा सादर करावी.
6) निविदाधारकाने पॅनकार्ड व आधारकार्ड याची स्कॅनप्रत तांत्रिक लिफाफथात अपलोड करावी.
7) GST CERTIFICATE ORIGINAL COPY (स्कॅन) प्रत निविदेसोबत सादर करावी.
8) निविदा भरणेपूर्वी संबधित ठेकेदाराने निवीदेत जाहीर केलेल्या वेळेनुसार (वेळ व दिनांक) गडाखालील व गडावरील स्थळ पाहणी केलेचा अहवाल / प्रमाणपत्र संबधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे जोडणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र नसल्यास संबधित ठेकेदारास अपात्र करणेत येईल.
9) निविदाधारकाने सदर योजनेच्या अंमलबजावणीचे कामाचे ठिकाणी स्वतः जावून नैसर्गिक परिस्थीतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. व तदनंतर सदरील काम करणेची स्वतः ची खात्री पटल्यानंतरच निविदा सादर करावी.
10) सदरील कामाचा आर्थिक लिफाफा उघडलेनंतर L1 निविदाधारकांने जिल्हा परिषद सांगिल अशा मुदतीत विहित नमुन्यात करारनामा करुन घेणे बंधनकारक राहील, विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केलेस संबंधित L1 निविदाधारकावर कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.
11) निविदा प्रपत्रातील Declaration of the contractor विहीत नमुन्यातील कंत्राटदाराचे रु. 500/- च्या बॉड(Bond) पेपरवर स्कॅनप्रत अपलोड करावी.
12) वित्त विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. GST1017/प्र.क्र.81/कराधान 1 मंत्रालय, मुंबई दि. 19/08/2017 मधील मुददा क्र. 1 नुसार निविदा सादर करताना दि. 01/07/2017 नंतर लागू झालेल्या GST कराच्या बोज्याचा विचार करुनच कंत्राटदराने निविदा सादर करणे अनिवार्य आहे.
13) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बीजीडी-2016/प्र.क्र./इमा-2 मत्रालय मुंबई यांचे दि. 12/02/2016 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार प्राप्त निम्नतम निविदेच्या देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1% ते 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढ्या रकमेच्या धनाकर्ष (Demand Draft) (मुख्य लेखा व वित्ताधिकारी, राजिप) यांचे नावे परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून या कार्यालयात सादर करावा लागेल. (उदा 1% ते 10% कमी दर 1% रक्कम)
14) ठेकेदाराने कामावर आलेल्या मजुरांची यादी ई-निविदेसोबत जोडणेत यावी तसेच कामावर आलेल्या सर्व मजुराचा काम सुरु करण्यापुर्वी विमा काढण्यात यावा अन्यथा प्रत्यक्ष काम करतेवेळी मजुर कर्मचारी अनावधानाने अपघात व दुखापत, मृत्यु झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल त्यासाठी जिल्हा परिषद मार्फत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.
15) या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रदद करणेचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा सादर करणा-या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) रदद केल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
16) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएटी 2018/प्र.क्र. 127/इमार मंत्रालय मुंबई दि 28/11/2018 नुसार निविदेसोबत सादर करणयात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भारतीय दंड विधान संहितेच्या कलम अंतर्गत संबंधित कंत्राटदाराविरुध्द फौजदाती गुन्हा दाखल करणेत येईल याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाईन खोटी कागदपत्रे सादर करणारे कंत्राटदार यांची असेल वाची नोंद घ्यावी.
17) ऑनलाईन निविदा सादर केल्यानंतर, निविदाधारकास लेखी पत्र देऊन निविदेतून माघार घेता येणार नाही. निविदाधारकाने असे केल्याचे दिसून आलेस संबंधित निविदाधारकाचे नोंदणी प्रमाणपत्र काळया यादीत समाविष्ट

करणे तसेच त्याची सुरक्षा अनामत इसारा रक्कम जप्त करणेची कार्यवाही करणेत येईल याची निविदाधारकाने गंभीर नोंद घ्यावी.

18) वर नमुद निविदा कोणत्याही क्षणी रदद करणेचे तसेच मंजुर / नामंजुरीचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवले असून ते निविदाधारकावर बंधनकारक राहतील व याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

19) सदरील काम हे अतितात्काळ व विहीत मुदतीसाठी असल्याने अल्प कालावधीकरीता (7 दिवस) निविदा सुचना प्रसिध्द केली आहे

20) वरील सर्व अटी व शर्ती निविदाधारकास मान्य असल्याने त्याने निविदा सादर केली आहे असे गृहीत धरले जाईल

सही/-
(मोहन ना.सरवदे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(शुभांगी नाखले)
प्रकल्प संचालक (जजीमि) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(राहुल कदम)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(नेहा भोसले) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

Signature Not Verified

Digitally signed by MOHAN NAGNATH SARWADE
Date: 2026.05.18 00:47:46 IST
Location: Maharashtra-MH